Naveen Shodh Sansar (An International Refereed / Peer Review Multidisciplinary Research Journal)
RNI No.- MPHIN/2013/60638, ISSN 2320-8767, E- ISSN 2394-3793, Scientific Journal Impact Factor (SJIF)- 8.054,
April to June 2025, E-Journal, Vol. I, Issue L (50), ISO 9001:2015 - E2024049304 (QMS)

मराठवाड्यातील ओ.बी.सी. समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे अध्ययन

डॉ. अविनाश शेंद्रे* प्रशांत तांदळे**

*** प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक, प्रगती कला व वाणिज्य महाविद्यालय, डोंबिवली (महा.) भारत**
**** संशोधन विद्यार्थी,संशोधन केंद्र, प्रगती महाविद्यालय, डोंबिवली (महा.) भारत**

प्रस्तावना – ओबीसी (इतर मागासवर्गीय) समाज हा मुख्यत: उत्पादन, कारागिरी आणि सेवा क्षेत्राशी संबंधित आहे. महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार या पारंपरिक व्यवस्थेतून हा समाज विकसित झाला आहे. विविध प्रकारच्या कौशल्यांनी संपन्न असलेल्या या गटाला हिंदू धर्मशास्त्रानुसार 'शूद्र' या वर्गात स्थान देण्यात आले. तथापि, या गटातील अनेक जातींनी कालांतराने स्वत%चा सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. भरतीय जातिव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे उच्चवर्णीय गट पारंपरिकदृष्ट्या सत्तोचे आणि संसाधनांचे लाभार्थी राहिले आहेत. याउलट शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया या गटांना सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक पातळीवर अनेक मर्यादा आणि अन्यायांचा सामना करावा लागला आहे. ब्रिटिश सत्ताकाळात भारताचे प्रशासन अधिक परिणामकारकपणे चालवण्यासाठी येथील समाजरचनेचा अभ्यास करण्यावर भर देण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून 1872 साली प्रथमच जातीनिहाय जनगणना सुरू करण्यात आली. यामुळे विविध जातींची लोकसंख्या, सामाजिक स्थिती आणि आर्थिक परिस्थिती यांचा अभ्यास करणे शक्य झाले यानंतर, मुंबई प्रांतातील जाती–जमातींचा सखोल अभ्यास करण्यासाठी 1885 मध्ये आर. ई. इन्थोवेन यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी सुमारे 500 जाती–जमातींचा विस्तृत अभ्यास करून त्यावरील संशोधन तीन खंडांमध्ये 1920 च्या दशकात प्रकाशित केले. या संशोधनामुळे भारतीय समाजरचनेविषयी अधिक तपशीलवार माहिती उपलब्ध झाली. स्वातंत्र्यानंतरही जातीव्यवस्थेचा अभ्यास सुरूच राहिला. 1985 साली डॉ. के. एस. सिंग यांच्या नेतृत्वाखाली भारतातील जाती–पातींचा व्यापक समाजशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पामुळे आधुनिक भारतातील सामाजिक रचना आणि बदलत्या प्रवृत्ती समजून घेण्यास मदत झाली. 2004 साली त्याचे 43 खंड प्रसिद्ध करण्यात आले.या संशोधनात 3000 हजार समाजशास्त्रज्ञ सहभागी झाले होते.आज रोजी भारतात एकुण 4635 जातीजमाती असल्याचे या अभ्यासातुन पुढे आले आहे.त्यात प्रामुख्याने 4 मोठे समुह आहेत. अनुसुचित जाती (अजा), अनुसुचित जमाती, (अज) विमुक्त जाती, भटक्या जमाती (विजाभज) आणि इतर मागास वर्ग (इमाव).आज देशातील अजाअजची लोकसंख्या 22.5% आहे. मंडल आयोगाच्या मते यातील ओबीसींची लोकसंख्या सुमारे 52% असुन रेणके आयोगाच्या मते विजाभजची लोकसंख्या 10% आहे.ते अनेक राज्यात ओबीसीतच धरले गेलेले आहेत.भारत सरकारच्या 'राष्ट्रीय नमुना पाहणी संस्थेच्या' 2004–5 च्या आकडेवारीनुसार देशात ओबीसींची लोकसंख्या 41% आहे.या तफावतीचे कारण असे आहे की मंडल आयोगाने 3743

जातींची मोजदाद ओबीसी म्हणुन केलेली असली तरी सर्वोच्च न्यायालयाने त्यातील फक्त 1963 जातींनाच ओबीसी म्हणुन मान्यता दिलेली आहे. यादीतील 3743 जातींना इतर मागासवर्गीयांमध्ये सरसकट समाविष्ट न करता राज्यांच्या यादीत आणि मंडलच्या यादीत दोन्हीकडे कॉमन असणार्या जातींनाच तेवढी ओबीसी म्हणुन मान्यता दिली आहे. (इंदिरा साहनी निवाडा, 16 नोव्हेंबर 1992) गेल्या काही वर्षात त्या यादीत 200 जातींची भर पडुन आता ही संख्या वाढलेली आहे, तथापि तीही लोकसंख्या नमुना पाहणीत आलेली नाही. 1994 साली मंडल आयोग महाराष्ट्रात लागु झाला तेव्हा महाराष्ट्राच्या ओबीसी यादीत क्रमाने 201 जाती असल्या तरी त्यातल्या 28 जाती वगळलेल्या होत्या. या शिल्लक 173 जातींच्या यादीत नंतरच्या काळात नव्याने 173 जातींची भर पडुन आज ही संख्या दुप्पट म्हणजे 346 झालेली आहे.नमुना पाहणीत मात्र आधीच्या 173 जातीच आलेल्या आहेत.महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांची स्वतंत्र सुची असुन त्यात असलेल्या जातीजमाती आणि विशेष मागास प्रवर्ग या घटकात असलेल्या जाती या सर्वाची एकुण संख्या 410 वर जाते.यांना सर्वाना मिळुन पंचायत राज्याच्या सत्तोत 27% आरक्षण आहे. राज्य सरकारच्या नोकर्या मध्ये 19%,11% आणि 2% असे एकुण 32% आरक्षण कागदावर असले तरी प्रत्यक्षात व्यवहारात मात्र एकुण 30% आरक्षण आहे.विमाप्र चे 2% आरक्षण ओबीसींच्या 19% मधुन दिले जात असल्याने ओबीसीला केंद्रात 27% आणि राज्यात 17% आरक्षण आहे असे म्हणणे उचित होईल. 1909 आणि 1919 साली ब्रिटीशांनी राजकीय पातळीवर मोर्ले–मिंटो सुधारणा लागु केल्या. 1919 साली साउथबरो कमिशन आणि त्यानंतर 1928 साली सायमन कमिशन नेमले गेले. मुंबई इलाखा सरकारने मागासवर्गियांचा अभ्यास करण्यासाठी याच काळात 5 नोव्हें. 1928 ला स्टार्ट कमेटी नेमली होती.डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ठक्कर बाप्पा, डॉ.सोळंकी असे अन्य सदस्य होते इतर मागास वर्ग अश्या समाजघटकांना संरक्षणाची गरज असल्याचा अहवाल सादर केला.अश्याप्रकारे 'ओबीसी' प्रवर्ग शासन दरबारी जन्माला आला. तांत्रिकदृष्ट्या सांगायचे तर, 'मागास वर्ग' (ठंबूंतक ब्सेंमे) ही संज्ञा सर्वप्रथम म्हैसूर संस्थानात उदयास आली. 'मागास समुदायां' मधील लोकांना सार्वजनिक सेवेत येण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या मुद्द्याचा विचार करण्यासाठी म्हैसूर सरकारने 1918 मध्ये एक समिती स्थापन केली. 'मागास समुदायां' ना नोकरभरतीत प्राधान्य देण्याची पद्धत ज्याची व्याख्या

'ब्राह्मणांव्यतिरिक्तचे असे सर्व समुदाय, ज्यांचे सध्या सार्वजनिक सेवेत पुरेसे प्रतिनिधित्व नाही' अशी करण्यात आली होती, ती 1921 मध्ये लागू करण्यात आली. 1928 मध्ये हार्टोग समितीने तयार केलेल्या परिभाषा–कोशात मागास वर्गाची व्याख्या 'शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या जाती किंवा वग' अशी करण्यात आली होती. या वर्गामध्येच उपेक्षित वर्गाचाही समावेश होतो. 'मागास वर्गाच्या मुद्दाकृज्यामध्ये गुन्हेगार जमाती (Criminal Tribes), स्थानिक लोक आणि ब्रिटिश भारताचे इतर कमी विकसित नागरिक यांचा समावेश होताकृतो 1929 मध्ये श्इंडियन सेंट्रल कमिटीश्ने अधोरेखित केला. त्रावणकोर संस्थानाने 1937 मध्ये 'उपेक्षित वर्ग' (Depresses Classes) ही संज्ञा वापरणे थांबवले आणि त्याऐवजी आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या सर्व लोकसमूहांना उद्देशून 'मागास समुदाय' ही संज्ञा वापरण्यास सुरुवात केली. असे असले तरी, मद्रास आणि इतर काही ठिकाणी अस्पृश्यांच्या सामाजिक स्तराच्या वरच्या टप्प्यावर असलेल्या वर्गाना 'मागास वर्ग' म्हणूनच संबोधले जात असे. दरम्यान, 13 डिसेंबर 1946 रोजी संविधान सभेत पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मांडलेल्या 'उद्दिष्ट ठरावा' मध्ये (Objective resolution) असे नमूद करण्यात आले होते की, 'अल्पसंख्याक, मागास व आदिवासी क्षेत्रे, तसेच उपेक्षित आणि इतर मागास वर्ग' यांच्यासाठी पुरेशा संरक्षणाची तरतूद केली गेली पाहिजे. संविधान सभेच्या काळापर्यत, देशाच्या अनेक भागांमध्ये 'मागास वर्ग' ही संज्ञा अशा कोणत्याही मोठ्या

लोकसमूहाचे वर्णन करण्यासाठी सर्रास वापरली जाऊ लागली होती, ज्यांना विशेष किंवा प्राधान्यपूर्ण वागणूक मिळणे अपेक्षित होते. परिणामी, संपूर्ण भारतभर या संज्ञेची कोणतीही एक स्पष्ट आणि एकच व्याख्या कधीच निश्चित होऊ शकली नाही.

संशोधन अभ्यासाची उद्दीष्टे

मराठवाड्यातील ओ. बी सी. समाजाच्या आर्थिक ,सामाजिक आणि अराजकीय परिस्थीचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्टे समोर ठेवण्यात आले आहेत

1. ओ.बी.सी. समाजाचा आढावा घेणे
2. ओ.बी.सी. च्या सामाजिक आणि आर्थिक साम्यस्यावर प्रकाश टाकणे .
3. ओ.बी.सी. समाजाच साठीचे सरकारचे धोरण जाणून घेणे .
4. ओ.बी.सी. समाजाच्या सक्षमीकरणासाठी उपायोजना सुचविणे सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे

संदर्भ साहित्याचा आढावा

मंडल अयोग – तत्कालीन जनता सरकारने न्या. मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली सण 1978 साली एका आयोगाची नेमणूक केली . या आयोगाने मागासवर्गीयांच्या बरोबरीने इतर मागासवर्गीयांचा वेगळा विचार करण्यात यावा अशी महत्पूर्ण सूचना देण्यात आली. परंतु या अहवालास उच्च वर्णीय, लोकांनी संपूर्ण देशभर अतिशय हिंसक वातावरण निर्माण केले. कारण यांना मंडल आयोगाने मागासवर्गीयांसाठी दिलेल्या शिफारशी मान्य नव्हत्या. असे असले तरी राखीव जांगांचा मागासवर्गीयावर झालेल्या परिणामाचे अध्ययन करण्यासाठी मुंबई मधील टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोसिअल सायन्स ची मदत घेण्यात आली.या संस्थेमार्फत देशातल्या कर्नाटक , बिहार , व उत्तर प्रदेश या राज्याची निवड करून मागास्वर्गीयांचे निकष ठरवण्यासाठी या राज्यातील 405 जिल्ह्यांचा अभ्यास करण्यात आला. संपूर्ण अभ्यास करून झाल्यांनतर या संस्थेने एकूण 11 निकष सुचवले. यात इतर मागास जातींनाही मागास म्हणले जावे असा महत्वपूर्ण निष्कर्ष हि निघाला. त्यांनतर मंडळ आयोगाने सखोल , व्यापक आणि शास्त्रयुक्त पद्दतीने अध्ययन करून मागासलेपणाची 3 कारणे म्हणजे निकष ठरवले यात प्रामुख्याने सामाजिक , आर्थिक , आणि शैक्षणिक यांचा समावेश होतो. यात एकूण 22 गुणांचा आधार घेण्यात आला त्यात या मंडल आयोगाने सामाजिक निकष ठरवण्यासाठी 12 गुण, शैक्षणिक

निकषांची 6 गुण तर आर्थिक निकषासाठी एकूण 4 गुण ठरवण्यात आले एकूण 22 गुणांचा आधार घेण्यात आला. व या 22 गुणांपैकी 11 गुण मिळतील त्याला मागासलेल्या जाती समजण्यात यावे असा निष्कर्ष या मंडल आयोगाने दिला. परंतु देशात मागासवर्गीयांची संख्या 52 टक्के असल्या कारणाने मागासवर्गीयांना 27 टक्के आरक्षण दिले गेले व इतर मागासवर्गीय उमेदवारांची स्पर्धा परीक्षेतून निवड झाल्यास त्याना या 27 टक्के आरक्षणामध्ये पकडण्यात येऊ नये अशा शिफारशी करण्यात आल्या होत्या.1990 साली या मंडळ आयोगाच्या अहवालावर कामकाज सुरु करण्यासाठी शासकीय अधिसूचना तयार करण्यात आली आणि इतर मागासवर्गीयांना प्रशासनात 27 टक्के आरक्षण देण्याची घोषणा झाली. परंतु या आरक्षणामुळे देशभरात प्रचंड गोंधळ निर्माण झाला आत्महत्या व विद्यार्थी आंदोलने सुरवात झाली. परिणामी सण 1991 रोजी सरकारने सुधारित अधिसूचना जरी करून मागासवर्गीयांचे 27 टक्के आरक्षण हे फक्त गरीब वर्गातील उमेदवारीसाठी व 10 टक्के आरक्षण आर्थिक दृष्टया मागसलेल्यासाठी असेल अशी सुधारणा केली.

समाज कल्याण मंडळ – देश स्वतंत्र झाल्यानंतर सण 1953 या साली डॉ दुर्गाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय समाज कल्याणमंडळाची स्थपणा करण्यात आली. अशाच प्रकारचे समाज कल्याण मंडळ राज्यस्थरवर असणे गरजेचे होते म्हणून राज्य सरकारने 1954 साली राज्यस्थरवर समाज कल्याण मंडळाची स्थपणा केली यात केंद्रीय समाज कल्याण मंडळाच्या अधिकार व विकेंद्रीकरण करून राज्यात अमलबजावणी करणे . तसेच केंद्रीय समाजकल्याण मंडळाच्या योजना व अनुदान यासाठी राज्यातील स्वयंसेवासस्थांची निवड करून शिफारशी करणे व अनुदान प्राप्तीनंतर त्यावर नियंत्रण ठेवणे तसेच राज्यातील मागास, अपंग, महिला, मुले , यांच्या सेवेसाठी व कल्याणासाठी विविध उपक्रम राबवणे व राज्य सरकार तसेच केंद्रिन्द्रय समाज कल्याण मंडळ आणि राज्यातील स्वयंसेवी संस्था यांच्यामध्ये योग्य असा समन्व्य निर्मण कर्ण्याचे कार्य या राज्य समाज कल्याण मंडळामार्फत केले जातात. याच समाज कल्याणामार्फत इतर मागासवर्गीयांसाठी देशातील विविध राज्यआतील समाज कल्याण मांडले आपापली भूमिका चोख पद्धतीने बजावत असताना आपणास दिसत आहे.

देशातील सर्व राज्यांपैकी इतर मागासवर्गीयांची संख्या महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात असल्या कारणाने महाराष्ट्र राज्य सरकारने महाराष्ट्र समाज कल्याण मंडळ अंतर्गत मागासवर्गीय तसेच इतर मागासवर्गीय अपंग या सारख्या घटकांचा आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी विवीध वित्त विकास महामंडळाची स्थापना केली. यात महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ लिमिटेड, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, मुंबई वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या् जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित , संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ

मर्यादित, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई या सारख्या वित्त आणि विकास महामंडळाची निर्मिती करून त्याना मान्यता देण्यात आली.

इतर मागासवर्गीय आयोग– 1990 सालच्या मंडळ आयोगाच्या शिफारशींमुळे देशभरात मोठ्या प्रमाणात गदारोळ निर्माण झाल्यामुळे सर्वच्च न्यायालयाने इतर मागासवर्गीयांसाठी वेगळ्या आयोगाची नेमणूक करण्याचे आदेश सरकारला दिले व सरकारला ते मान्य करावे लागले. म्हणून सण 1993 साली इतर मागासवर्गीयासाठी वेगळ्या आयोगाची नेमणूक करून त्याला इतर मागासवर्गीय आयोग असे म्हणण्यात येऊ लागले. या आयोगाची रचनात्मक बांधणी झाल्यांनतर त्यांच्या कार्याची सुरवात झाली यात प्रामुख्याने यात आयोगाने तयार केलेले अहवाल केंद्र सरकरकडे सादर करून केंद्र सरकार तो अहवाल संसदेत सादर केले जाते. त्याचबरोबर या आयोगाला स्वत:ची कार्यपद्धती ठरवण्याचे अधिकार देण्यात आले यात प्रामुख्याने कोणत्या जाती मागास आहेत व जात मागास नसल्यास त्यानाच इतर मागसवर्गात समावेश करण्यात यावा व येऊ नये त्याचबरोबर कोणती जात समाविष्ट केली जावी व करू नये याचे अधिकार या आयोगाला देण्यात आले म्हणजे च एखादी जात मागास नाही असे आढळल्यास त्या जातीला इतर मागासवर्गातून वगळण्याचे अधिकार या आयोगाकडे ठेवण्यात आले आहेत. आयोगाने सादर तयार केलेल्या अहवालाचा केंद्र सरकार दर 1. वर्षाने अहवाल चा आढावा घेत असतो

म्हस्के दयाराम 2016– यांनी महार्ष्ट्र प्रसासणात आरक्षण धोरणाची अमलबजावणी या संदर्भात संशोधन करत असताना मराठवाडा विशेष क्षेत्राची निवड करून असा निष्कर्ष मांडला की भारतीय जाती व्यवस्था ही कर्मावर आधारित असून जात ही संस्था हिंदू धर्म व्यवस्थेचा आधार आहे. यात आरक्षण हा भाग जाती आणि वर्ण वायवस्थेवरच आहे यात ब्राह्मण , क्षत्रीय वैश्य , शूद्र यांचा समावेश होतो. समजातल्या घातक संरक्षण शिक्षण सेवा , व्यापार , इ. पारंपरिक रित्या देण्यात आले.भारताच्या स्वातंत्र्यानंतर आरक्षणास घटनात्मक दर्जा प्राप्त झाला . वर्णव्यवस्थेतील आरक्षण विरोधातील क्रिया प्रतिक्रिया संबंधी न्याय मागण्याची संधि मागासवर्गीयांना उपलब्ध नव्हती. परंतु आरक्षण धोरनामुळे मूलभूत हक्काचा समावेश केल्याने मागासवर्गीयांना न्याय मागची मदत मिळाली. व तशी व्यवस्था राज्य घटनेमध्ये करण्यात आली आहे संशोधकाने आपल्या सशोधनात असे स्पष्ट केले की भारतीय सरकारी उच्च कार्यालयातिल अनुसूचीत जाती व जमातीसह इतर मागासवर्गीयांच्या सरकारी नोकर्याच (मराठा , यादव , पटेल) यांच्या वाट्याच्या शासकीय नोकर्यी ब्राम्हण वर्गाने लटल्या आहेत .

रावते नूतन 1989 यांच्या मते आजकालचे मराठवड्यातील उद्योग ठिसुळ पायावर आधारित आहेत . त्यांना अधिक अधिक भक्कम करण्यासाठी त्या ठिकाणी कच्चा माल व बाजारपेठ उपलब्ध होणे गरजेचे आहे . तसेच या भागातील समाजाच्या विविध थरातील तरुण स्त्रि पुरुष उद्योजकांनी साखळी निर्माण केली पाहिजे . त्यात पुरेशा भांडवलमुळे मराठवाड्यातील 25 टक्के उद्योग बंद पडले आहेत . मराठवाड्यामध्ये बाहेरील उद्योजकांना आकर्षित करण्याचे धोरण जाहीर करूनही त्या ठिकाणी म्हणावी अशी प्रगती दिसून आली नाही.

उत्तम कांबळे 2007 ओ बी सी समाज हा आर्थिकदृष्ट्या मागास असला तरी तो सामाजिक दृष्ट्या प्रतिष्ठित आहे. कारण या जातीकडे स्वतचे असे पारंपरिक चालणारे व्यवसाय होते परंतु वाढत्या औद्योगिकीकरनामुळे हे व्यवसाय बंद पडले . परिणामी त्यांना शिक्षणशिवाय पर्याय उरला नाही परंतु उच्च वरणीय घटकांना तोंड देणे व त्यांच्याशी स्पर्धा करणे हे शक्य झाले नाही कारण या जातीमध्ये मुळातच गरीब आणि अशिक्षितपना होता . कांबळे यांच्या मते जर हा समाज एकत्र आला तर देशातल्या राजकारणाचा नकाशा क्षणात बदलू शकतो . तशा संधीही यांना आरक्षण , सत्तापालट याच्या माध्यमातून मिळत असते परंतु यांनी त्याचा फायदा घेणे गरजेचे आहे

सतीश कान्हू (1998) यांनी केलेल्या संशोधनवरून असे समजते की सर्वे केलेल्या मागासवर्गीयांच्या एका कुटुंबात एकच व्यक्ति कमवत असणार्या) कुटुंबाची संख्या सर्वाधिक आहे. संशोधकाच्या मते शिक्षणाच्या प्रसारामुळे ओबीसी समजातल्या मुलींमध्ये सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे . तसेच तरुण पिढीमध्ये अनौपचारिक शिक्षण घेण्यास आशावादी आहेत असे दिसते. तसेच या जातीमध्ये सामाजिक प्रथा प्रचलित असून हा समाज धार्मिक विधीसारख्या प्रथा पाळत असल्याचे संशोधकाने म्हंटले आहे

महाराष्ट्र सरकारचे ओ. बी. सी. समाजाबाबतचे धोरण – महाराष्ट्र सरकारचे ओबीसी (इतर मागासवर्गीय) समाजाबाबत सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासावर केंद्रित आहे, ज्यामध्ये 27% आरक्षणाचे रक्षण, महाज्योतीद्वारे कौशल्य विकास, आणि शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. राज्य सरकार ओबीसींच्या आणखी 29 जातींचा समावेश केंद्राच्या यादीत करण्यासाठी प्रयत्नशील आहे, आणि बनावट कुणबी प्रमाणपत्रे रोखण्यासाठी तसेच विद्यमान आरक्षणाचे संरक्षण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत. ओबीसी, विशेष मागास प्रवर्ग (SBC), आणि भटक्या जमाती (NT) च्या विद्यार्थ्यांसाठी महाज्योती (Mahajyoti) संस्थेमार्फत कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती योजना. राज्य सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणामध्ये 27% आरक्षणाची अंमलबजावणी. जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यात अडचणी येत असल्याने, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा कालावधी वाढवून देण्यावर भर. ओबीसी वर्गाच्या आणखी 29 जातींचा समावेश केंद्र सरकारच्या यादीत करण्यासाठी प्रस्ताव पाठवला आहे, ज्यामुळे त्यांना केंद्रीय योजनांचा लाभ मिळेल. ओबीसी क्रीमी लेअरमध्ये (पालकांचे वार्षिक उत्पन्न क्र8 लाखांपेक्षा जास्त) येणाऱ्या उमेदवारांना आरक्षण नाही, परंतु नॉन-क्रीमी लेअरमधील उमेदवारांना सवलती मिळतात बनावट कुणबी जात प्रमाणपत्रांद्वारे होणाऱ्या आरक्षणाच्या गैरवापराबाबत ओबीसी समाजाकडून आक्षेप नोंदवल्यानंतर सरकार या प्रकरणाची तपासणी करत आहे. सध्य परिस्थिती पाहता ओबीसींना राजकीय आरक्षण मिळालेच पाहिजे या विषयावर सगळ्याच पक्षांचे एकमत आहे असे दिसते इतर मागासवर्गीय (OBC), विमुक्त जात, भटके आणि विशेष मागासवर्गीयांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या मार्फत विविध वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात येत येत आहे. यात प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ ,तसेच शॅक्षणिक सुधारणा व्हावी यासाठी शासनाकडून विविध शिष्यवृत्ती सुरु करण्यात आली आहेत. अलीकडच्या काळात आरक्षणाचे प्रश्न सोडवण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करून निर्णय घेतले जात आहेत ओबीसी समुदायासाठी ओबीसी मंत्रालयाची 2016 मध्ये स्थापना केल्यामुळे या समुदायाचा विकास करण्यासाठी त्यांच्याशी संबंधित केंद्रीत धोरणे ठरविण्यासाठी त्याचा नक्कीच फायदा होईल. अशा पद्धतीचा विचार यापूर्वी

देशातील कोणत्याच राज्यात झाला नव्हता. या स्वतंत्र विभागाद्वारे ओबीसींसाठीच्या कल्याणकारी योजना रोबवणे, त्याची अंमलबजावणी करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्याचा लाभ संबंधितांना मिळवून देता येऊ लागला. या विभागामुळे सर्वसामान्य ओबीसी समाजाच्या अडचणी थेट सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी एक माध्यम निर्माण झाले.

ओबीसी विभागांतर्गत कार्यरत संस्था व महामंडळे

1. इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
2. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
3. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर
4. महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), मुंबई
5. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई
6. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई
7. महात्मा फुले विकास महामंडळ
8. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊस साठे विकास महामंडळ
9. संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ
10. पुण्यश्लोक आहिल्यादेवी शेळी,मेंढी विकास महामंडळ
11. शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ

सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचनचा क्र. शाकानि 2017/ प्र.क्र.33/18 (र.व. का.), दि. 09 मार्च 2017 अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग कल्याण विभागाची निर्मिती करण्यात आली. त्याचबरोबर विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागसवर्ग विशेष व मागासवर्ग कल्याण विभागाकरीता पदांची निर्मिती करण्यास मंजुरी देण्यात आली.

इतर मागासवर्गातील युवकांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी ओबीसी महामंडळास दोन अर्थसंकल्पीय अधिवेशनात 5.. कोटी रुपये देण्याची घोषणा केली वरील परिस्थिती पाहता महाराष्ट्र सरकार ओ बी सी समाजासाठी उपयोगी आणि ठरतील अशीच धोरणे राबवत असल्याचे आपणास दिसते

मराठवाड्यातील ओबीसी (इतर मागासवर्गीय) समाजासमोरील प्रमुख आठहाने/अडचणी

शैक्षणिक मागासलेपण शिक्षणाचा दर्जा व प्रवेश कमी असल्यामुळे शैक्षणिक मागासलेपण मोठ्या प्रमाणात आहेत.आर्थिक मराठवाडयात इतर मागासवर्गीय समाज लहान व सीमांत शेतीवर अवलंबून आहे परिणामी त्यांचे उत्तपन्न मर्यादित आहे. मायादित उसन्न सरोत असल्यामुळे कार्बाजारीपणा वाढलेला दिसत आहे मराठवाडा हा दुष्काळ प्रवण क्षेत्र असल्यामुळे तेथे बेरोजगारी व अपुरा रोजगार उपलब्ध आहे कौशल्यांच्या अभावामुळे योग्य नोकऱ्या मिळत नाहीत असंघटित क्षेत्रात जास्त प्रमाणात काम स्थिर उत्पन्नाची कमतरता सामाजिक भेदभावजातीय भेदभाव अजूनही अस्तित्वात सामाजिक प्रतिष्ठा कमीनिर्णयप्रक्रियेत मर्यादित सहभाग आरक्षणाच्या अंमलबजावणीतील त्रुटीआरक्षित जागा पूर्णपणे भरल्या जात नाहीत उच्च शिक्षण व उच्च पदांमध्ये कमी प्रतिनिधित्व धोरणांची अपुरी अंमलबजावणी स्थलांतराची समस्या ग्रामीण भागातून शहरांकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर ऊसतोड मजूर व हंगामी कामगार म्हणून काम ,अस्थिर जीवनशैली, आरोग्य व मूलभूत सुविधांचा अभाव ,ग्रामीण भागात आरोग्य सुविधा अपुऱ्या स्वच्छ पाणी व निवासाच्या समस्या, कुपोषण व आरोग्यविषयक समस्या, माहिती व जागरूकतेचा अभावशासकीय योजनांची माहिती कमी लाभ मिळवण्यात अडचणी, प्रशासकीय प्रक्रियेबद्दल अज्ञान, राजकीय प्रतिनिधित्व मर्यादितस्थानिक पातळीवर काही प्रमाणात सहभाग असला तरी उच्च स्तरावर कमी निर्णयप्रक्रियेत प्रभाव कमी ,पारंपरिक व्यवसायांवर अवलंबित्वआधुनिक कौशल्यांचा अभाव पारंपरिक व्यवसायांची घटती मागणी

मराठवाड्यातील ओ.बी.सीं.च्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती –

मराठवाडा हा महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त व आर्थिक दृष्ट्या मागासलेला प्रदेश आहे या प्रदेशांमध्ये इतर मागासवर्गीय समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वास्तव्य करत आहे मराठवाडा दुष्काळग्रस्त मानला जातो या समाजाच्या सामाजिक स्थितीचा जर आपण नीट अभ्यास केला तर असे दिसते की या समाजामध्ये शिक्षणाची कमतरता आहे त्याचबरोबर हा समाज जातीय भेदभावासारख्या गोष्टीला सामोरे जात आहे मराठवाड्यात पावसाचे प्रमाण अतिशय कमी असल्यामुळे इतर आरोग्य सुविधा अपूर्ण आहेत परिणामी तेथील समाजाला आपल्या आर्थिक उन्नतीसाठी गाव सोडून शहरी भागाकडे वळावे लागत असल्याने आपल्या दिसते म्हणजेच मराठवाड्यातील इतर मागासवर्गीय समाज सामाजिक दृष्टीने मागास आहे कारण त्यांच्या जाती भेदभाव सारख्या गोष्टीला सामोरे जावे लागत आहे मराठवाड्यातील ओबीसींच्या बाबत विचार केला असता 2000 च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार जिल्ह्याने आहे संख्या उपलब्ध नाही मराठवाड्यातील ओबीसींची अंदाजीत लोकसंख्या मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये इतर मागासवर्गीय यांची लोकसंख्या साधारणत: 35 ते 40 टक्के असल्याचे मानले जाते राज्य मागासवर्गीयांच्या निष्कर्षानुसार राज्य बागासवर्गीय आयोगाने गोखले इन्स्टिट्यूट यांनी दिलेल्या

माहितीनुसार राज्यात सरासरी 38% एवढी इतर मागासवर्गीयांची संख्या आहे मराठवाड्यात निजाम काळातील कुणबी नोंदी असल्याने मोठ्या प्रमाणात मराठा समाजाच्या समावेश इतर मागासवर्गीय वर्गात होत आहे यामुळे इतर मागासवर्गीयांची

अधिकृत आकडेवारी टक्केवारी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यातच इतर मागासवर्गीय मध्ये ऊसतोड मजूर आणि औद्योगिक कामगारांच्या स्थलांतरामुळे जिल्ह्यातील वास्तविक लोकसंख्येचा परिणाम होऊन ती सतत बदलत जाणारी असते असे आपणास दिसते. मराठवाड्यातील ओबीसी (इतर मागासवर्गीय) समाजाची निश्चित लोकसंख्या अधिकृतपणे जाहीर झालेली नाही, कारण भारतात 2011 नंतर कोणतीही जातनिहाय जनगणना झालेली नाही. मराठवाड्यातील इतर मागासवर्गीय समाजाची आर्थिक परिस्थिती व सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करण्यासाठी महत्त्वाची घटक तपासणी आवश्यक आहे यात व्यवसाय शेतीवरील अवलंबित व शैक्षणिक स्तर स्थलांतर तसेच शासकीय व निमशासकीय योजनांचा त्यांच्यावर झालेला परिणाम या स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक आहे सामाजिक स्थिती. मराठवाडा हा दुष्काळ प्रवण भाग असल्याकारणामुळे ओबीसी समाजाची आर्थिक स्थिती पावसावर अवलंबून आहे यात बरेच लोक लहान शेतकरी किंवा भूमिहीन शेतमजूर यांचे प्रमाण अधिक असल्याने त्यांचे उत्पन्न अतिशय कमी स्वरूपाचे असते परिणामी समाज कर्जबाजारी होऊ लागतो कर्जबाजारीपणामुळे आर्थिक अस्थिरता त्यांना वाटू लागते मराठवाड्यातील एकूण शेती संरचनेचा अभ्यास केला असता असे दिसते की सुमारे 60 टक्के

लोकसंख्या शेती लहान म्हणजे अल्पभूधारक असल्याचे समजते मराठवाड्यातील ओबीसी शेतीचे जिल्हा निहाय वर्गीकरण खालील प्रमाणे दिले आहे वरील परिस्थितीवरून आपणास असे दिसते की ग्रामीण

भागात ओबीसी समाजाचे उत्पन्न अतिशय कमी असल्यामुळे ते दारिद्रयरेषेजवळ आले आहेत तर काही लोक दारिद्र रेषेच्या खाली गेलेले आहेत असे आपणास दिसते त्यामुळे आपली उपजीविका करण्यासाठी बराचसा मोठ्या प्रमाणामधला ओबीसी समाज शहरी भागामध्ये स्थलांतर करत आहे असे दिसते परिणामी पारंपरिक व्यवसायात तसेच लोहार सुतार माळी लोहार यासारख्या पारंपारिक व्यवसायावर अवलंबून राहावे लागते .

मराठवाड्यातील कृषी कामगारांचे जिल्हानिहाय वर्गीकरण

जिल्हा	कृषी कामगार (%)	कृषी मजूर (%)
हिंगोली	74.8	46.61
बीड	72.39	36.06
उस्मानाबाद	70.98	48.26
जालना	70.93	39.63
परभणी	69.3	50.58
लातूर	66.4	55.23
नांदेड	64.01	56.41
औरंगाबाद	55.7	40.08

Source: Computed from the data obtained from Directorate of Agriculture, Department of Agriculture, Government of Maharashtra, Pune.

मराठवाड्यातील हिंगोली, बीड आणि जालना या जिल्ह्यांची अर्थव्यवस्था आजही मोठ्या प्रमाणावर शेतीवर आधारित आहे, तर औरंगाबादमध्ये बिगर-शेती क्षेत्राचा प्रभाव अधिक दिसून येतो. लातूर आणि नांदेडमध्ये शेतमजुरांची संख्या 55% पेक्षा जास्त असणे ही एक सामाजिक-आर्थिक चिंतेची बाब ठरू शकते.

मराठवाड्यातील इतर मागासवर्गीयांची शैक्षणिक स्थिती

अनु.	शैक्षणिक स्थिती	लाभार्थी संख्या	टक्केवारी
1	प्राथमिक	15	15
2	माध्यमिक/ उच्च माध्यमिक	25	25
3	पदवी	20	20
4	अशिक्षित	40	40
7	एकूण	100	100

स्रोत –प्राथमिक माहिती संकलनाच्या आधारे

वरील तक्ता मध्ये आपणास स्पष्टपणे दिसते की, प्राथमिक 15 % उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या लाभार्थ्याचे प्रमाण 25 % एवढे असून ती इतर शिक्षणाच्या तुलनेने असल्याचे दिसते. अशिक्षित लाभार्थ्यांची संख्या सर्वाधिक 40 % असल्याचे निदर्शनास येथे. तर पदवी शिक्षण घेतलेल्यांची संख्या एकूण लाभार्थ्यापैकी 20 % एवढीच आहे. वरील शैक्षणिक परिस्थिती विचारात घेतली असता. लाभार्थी फारसे उच्च शिक्षित नाहीत असे याठिकाणी नमूद करावेसे वाटते. मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यांचे साक्षरता प्रमाण हे राज्य सरासरीच्या खाली आहे. यासाठी शासनाने शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करावा व त्याचा लाभ गरजूंना मिळेल अशी व्यवस्था निर्माण करावी. विद्यार्थ्यांना शिकविला जाणारा अभ्यासक्रम हा रोजगारक्षम असला पाहिजे. 'कौशल्य प्रशिक्षण केंद्र' स्थापन करून व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात यावे. ऑल इंडिया कोटामधून वैद्यकीय शिक्षणासाठी ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या 9 हजाराहून जास्त जागा ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना नाकारण्यात आलेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग (University Grant Commision) नुसार भारतातील केंद्रीय विद्यापीठांमध्ये ओबीसी समाजातील प्राध्यापकांची संख्या 5 टक्क्यांपेक्षा कमी आहे. वास्तविक पाहता येथे ओबीसी समाजातील प्राध्यापकांची संख्या ओबीसी आरक्षणानुसार 27 टक्के असायला हवी. राष्ट्रीय विधी महाविद्यालयांमध्ये (National Law Universities) मध्ये ओबीसी समाजाचे 27 टक्के आरक्षणाची तरतूद पूर्णपणे डावलण्यात आली आहे. इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट (IIM) सारख्या उच्च शिक्षणाच्या महत्वाच्या संस्थांमध्ये सुद्धा ओबीसी समाजाच्या प्राध्यापकांसाठीच्या आरक्षित असलेल्या 27 टक्के जगांपैकी 52 टक्के जागा या भरल्या गेलेल्या नाहीत. भारतीय विज्ञान संस्था (Indian Institute of Science) या संस्थेमध्ये ओबीसी प्राध्यापकांच्या आरक्षित असलेल्या 9. टक्के जागा भरल्या गेलेल्या नाहीत.या आकडेवारीमधून हे स्पष्ट लक्षात येते, की स्वतंत्र भारतामध्ये अजूनही ओबीसी समाजाचे शैक्षणिक दमन कशा पद्धतीने केले जात आहे.

ओबीसी समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास राहिलेला आहे. संविधानिक तरतुदी असूनही प्रत्यक्षात त्यांचा पुरेसा लाभ मिळत नाही. मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागात ओबीसी समाजाची परिस्थिती अधिक गंभीर आहे. त्यामुळे शिक्षण, रोजगार, सिंचन सुविधा आणि सामाजिक समतेसाठी प्रभावी धोरणांची गरज आहे.

परिणाम– जातिव्यवस्था आणि तिच्या पार्श्वभूमीवर विकसित झालेल्या ओबीसी समाजाच्या स्थितीमुळे भारतीय समाजावर अनेक सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय परिणाम झाले आहेत

1. **सामाजिक परिणामसामाजिक विषमता वाढली –** उच्च-निम्न अशी श्रेणी निर्माण होऊन समानतेचा अभाव राहिला. ओबीसी व इतर खालच्या घटकांना सामाजिक प्रतिष्ठा कमी मिळाली. समाजात संघर्ष, असंतोष आणि विभागणी वाढली या कारणामुळे समाजची गतिशीलता कमी झाली

2. अलीकडील काळात शिक्षणाच्या सोइ उपलब्ध असून देखील उच्च शिक्षणात कमी प्रतिनिधित्व आणि व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणात सहभाग कमी झाला

3. **आर्थिक परिणाम–** गरिबी आणि अस्थिर उत्पन्न रू पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून राहावे लागते व आहे त्यात जमिनीचे असमान वाटप रू लहान व सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त. आणि औद्योगिकध्नोकरी संधी कमी

शिफारशी/उपायजोजना

1. **जातीनिहाय जनगणना–** समाजाची नेमकी लोकसंख्या आणि त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती समजून घेण्यासाठी जातनिहाय जनगणना लवकरात लवकर राबवावी, जेणेकरून धोरणे अधिक अचूक ठरवता येतील. स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणेच उच्च स्तरावरील धोरण ठरवणाऱ्या समित्यांमध्ये ओबीसी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व द्यावे स्थलांतर रोखण्यासाठी ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी हंगामी शाळा आणि त्यांच्या आरोग्यासाठी फिरते दवाखाने उपलब्ध करून द्यावेत.स्वच्छ

2. **पाणी आणि स्वच्छता–** मराठवाड्यातील दुष्काळी गावांमध्ये शुद्ध

पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प प्राधान्याने राबवावेत, जेणेकरून आरोग्यावरील खर्च कमी होईल.

3. जागरूकता आणि प्रशासन – योजनांची माहिती पोहोचवणेरू ग्रामीण भागात शासकीय योजनांची माहिती देणारी विशेष यंत्रणा (उदा. माहिती केंद्र किंवा मोबाईल ?प) उभारावी.प्रशासकीय पारदर्शकतारू आरक्षणाचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी (उदा. नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र) कमी करण्यासाठी एक खिडकी योजना (Single Window System) सुरू करावी.या शिफारशींची अंमलबजावणी केल्यास मराठवाड्यातील ओबीसी समाजाच्या राहणीमानात आणि सामाजिक दर्जा मध्ये सकारात्मक बदल घडून येऊ शकतो.

4. आरक्षणाचे उप-वर्गीकरण (Sub Categorization)- ओबीसींमधील काही मोजक्याच जातींना आरक्षणाचा जास्त लाभ मिळत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे ओबीसींच्या 27% कोट्याचे अंतर्गत वर्गीकरण करून अधिक मागास जातींना न्याय मिळवून देणे.

5. सरकारी सेवा आणि शैक्षणिक संस्थांमधील ओबीसींसाठी राखीव असलेल्या रिक्त जागा प्राधान्याने भरण्यासाठी 'बॅकलॉग' मोहिमा राबवणे.

6. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या रकमेत महागाईनुसार वाढ करणे आणि ती वेळेवर वितरित करणे.

7. क्रिमी लेअरची (Creamy layers) वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढवणे, जेणेकरून मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांना आरक्षणाचा लाभ घेता येईल.

8. प्रत्येक जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी ओबीसी मुला-मुलींसाठी स्वतंत्र शासकीय वसतिगृहे बांधणे.

9. पारंपारिक व्यवसायात असलेल्या जातींसाठी (उदा. विणकर, कुंभार, सुतार) आधुनिक तंत्रज्ञान आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू करणे.

10 स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींचे आरक्षण कायम ठेवण्यासाठी आवश्यक 'एम्पेरिकल डेटा' (म्उचपतपबंस वंज) संकलित करणे.

निष्कर्ष – मराठवाड्यातील OBC समाज सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अनेक अडचणींना सामोरे जात आहे. दुष्काळ, शिक्षणाचा अभाव, कर्जबाजारीपणा, आणि स्थलांतर यामुळे त्यांची प्रगती मर्यादित राहिली आहे. त्यामुळे या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, रोजगारनिर्मिती, सिंचन सुविधा आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. मराठवाड्यातील OBC समाज अनेक सामाजिक व आर्थिक अडचणींना सामोरे जात असला तरी योग्य धोरणे, शिक्षण, रोजगारनिर्मिती आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास या समाजाचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो. दुष्काळग्रस्त परिस्थिती, पावसावर अवलंबून असलेली शेती, शिक्षणाचा अभाव, कर्जबाजारीपणा आणि मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर यामुळे या समाजाची प्रगती मर्यादित राहिली आहे. त्याचबरोबर जातीय भेदभाव आणि अपुऱ्या आरोग्य व पायाभूत सुविधांमुळे त्यांची जीवनमानाची गुणवत्ता कमी राहते.तथापि, योग्य शैक्षणिक संधी, कौशल्य विकास, सिंचन सुविधा, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांद्वारे या समाजाचा सर्वांगीण विकास साधता येऊ शकतो. त्यामुळे शासन आणि समाज यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे मराठवाड्यातील ओ.बी.सी. समाज अधिक सक्षम, स्वावलंबी आणि प्रगत होऊ शकतो. मराठवाड्यातील ओबीसी समाज सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असून दुष्काळ, शिक्षणाचा अभाव, कर्जबाजारीपणा आणि स्थलांतर या प्रमुख समस्यांना सामोरे जात आहे. पावसावर अवलंबून असलेली शेती आणि मर्यादित रोजगाराच्या संधी यामुळे त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत राहिली आहे. तसेच सामाजिक स्तरावरही जातीय भेदभाव आणि अपुऱ्या सुविधा यांचा परिणाम दिसून येतो. भारतीय जातिव्यवस्था ही

ऐतिहासिकदृष्ट्या सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण राहिली असून, ओबीसी समाजाने उत्पादन व सेवा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले असले तरी त्यांना दीर्घकाळ दुय्यम स्थानाला सामोरे जावे लागले. शिक्षण, अर्थकारण आणि सामाजिक प्रतिष्ठा या सर्व क्षेत्रांत या समाजावर मर्यादा आल्या. स्वातंत्र्यानंतर आरक्षण, विविध आयोग आणि शासकीय धोरणांमुळे ओबीसी समाजाच्या उन्नतीस चालना मिळाली, तसेच सामाजिक जागरूकता आणि राजकीय सहभाग वाढला. तरीही अंतर्गत विषमता, शिक्षणातील तफावत आणि आर्थिक अस्थिरता यांसारखी आव्हाने आजही कायम आहेत

संदर्भ ग्रंथ सूची :-

1. वायर, ओबीसी समाज – दशा आणि दिशा आनंद क्षीरसागर श्रनसल 1, 2021
2. International Journal of Research Publication and Reviews Journal homepage: www.ijrpr.com ISSN 2582-7421
3. गोगटे श्री ब मराठवाडयातील सूची औरंगाबाद पद्मालय प्रकाशन 2001
4. कुलकर्णी भुजंगराव मराठवाड्याचा विकास अभयास व चिंतन औरंगाबाद श्रेयस प्रकाशन 1998
5. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, लातूर 2022
6. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल अर्थ व सांख्यिकी संचलनालय व नियोजन विभाग मुंबई 2011-2012
8. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल अर्थ व सांख्यिकी संचलनालय व नियोजन विभाग मुंबई 2021-2022
9. बुटे नंदू समस्या व उपाय 2010 जिजाई प्रकाशन पुणे
10. इतर मागासवर्गीय आणि जनगणना – माधुरी भामरे पुणे -2016
11. ओबीसी राजकारण कृषिवल दिवाळी अंक 2012 Monday, december 3, 2012
12. ओ.बी.सी.च्या विकासासाठी घटनात्मक तरतुदी डॉ। माया मसराम गडचांदूर ISSN 2231-1629
13. म्हस्के दयाराम 2016 – महार्ष्ट्र प्रसासणात आरक्षण धोरणाची अमलबजावणी
14. यशवंत झगडे ओबीसी अस्मिता आणि समकालीन प्रश्न 2019 TISS
15. Dr. Sandeep B. Gaikwad*WAGE RATE DIFFERENCES IN MARATHWADA REGION International Journal of Education, Modern Management, Applied Science & Social Science (IJEMMASSS) 52 ISSN : 2581-9925
16. https://www.lokmat.com/mumbai/many-recommendations-of-the-cabinet-sub-committee-will-accelerate-the-resolution-of-the-issues-of-the-obc-community-a-a571/